मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# विधानसभा उपसभापतींचे पालिकेच्या पायऱ्यांवर ठाण

## डीपी प्लॅन विरोधात राष्ट्रवादीचा मोर्चा; मोर्चाचे निवेदन राष्ट्रवादी आता मुख्यमंत्र्यांना देणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेने नुकताच शहरासाठी सुधारित प्रारुप विकास आराखडा सादर केला आहे. या आराखड्या विरोधात तब्बल पन्नास हजार हरकती नागरिकांनी घेतल्या आहेत. या आराखड्यातील गंभीर त्रुटी, अनियमतता आणि जनविरोधी धोरणांविरोधात आवाज उठविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने महापालिकेवर महामोर्चा काढण्यात आला. या विरोधातील निवेदन स्वीकारण्यासाठी आयुक्त शेखर सिंह पालिका प्रशासकीय इमारतीत उपस्थित नसल्यामुळे विधानसभा व सभापतींना पालिकेच्या पायऱ्यांवर बसावे लागले. दरम्यान शिष्टमंडळ आयुक्तांना निवेदन देणारा आहेत हे माहीत असताना सुद्धा आयुक्त जाणीवपूर्वक अनुपस्थित राहिले. त्यांच्या या वागणुकीबद्दल थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे चौकशीची मागणी करणार आहे.



आणि डीपी प्लॅन विरोधातील निवेदन आता मुख्यमंत्र्यांकडेच देणार असल्याचे विधानसभा उपसभापती अण्णा बनसोडे यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रारूप सुधारित विकास आराखड्यातील जनविरोधी आरक्षणांविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तर्फे गुरुवारी शहरात जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. शगुन चौक, पिंपरी येथून सुरू झालेला हा मोर्चा जोरदार घोषणाबाजी करत पुणे-मुंबई महामार्गावरून मार्गक्रमण करत महापालिका मुख्यालयावर धडकला.

या आंदोलनात विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल, महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, माजी आमदार विलास लांडे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक अजित गव्हाणे, माजी उपमहापौर डब्बू आसवाणी यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन देण्यासाठी राष्ट्रवादीचे शिष्टमंडळ मुख्यालयात गेले. पण, आयुक्त हे विभागीय आयुक्तांची बैठक असल्याचे कारण देवून निघून गेले होते. त्यावेळी अतिरिक्त आयुक्त देखील

> राज्य निवडणूक आयोग, सफाई आयोगाचे पदाधिकारी पुण्यात उपस्थित होते. या संदर्भातील प्रश्नसंदर्भात बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक होते. त्या बैठकीला मी गेलो होतो. राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची बैठक महापालिकेत होती. त्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त उपस्थित होते.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

तिथे उपस्थितीत नव्हते. त्यामुळे राष्ट्रवादीकडून निवेदन न देता प्रवेशव्दारावर ठिय्या आंदोलन करण्यास सुरुवात केली.

यावेळी उपसभापती आण्णा बनसोडे म्हणाले की, महानगरपालिकेत आम्ही निवेदन देण्यास आलोय, तर आयुक्त थांबले नाहीत, हे चुकीचं आहे. पण त्यांना माहित नाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड शहराचा विकास केला आहे. शहराचा नव्याने विकास आराखडा तयार करण्याचं काम, गेली दोन महिन्यापासून सुरू आहे. त्या विकास आराखड्यामध्ये चुकीची आरक्षणे टाकलेले आहेत. 50 हजार हरकती आल्या होत्या. त्या सर्वांचा रोष धरूनच आज जन आक्रोश मोर्चा आयोजित केला. M

आज या ठिकाणी पक्षाचे सर्व पदाधिकारी प्रमुख नगरसेवक अध्यक्ष सर्वजण आले होते, आमच्या सर्वांचा आयुक्त शेखर सिंह यांनी अपमान केला आहे. त्यामुळे आजचे हे निवेदन त्यांना न देता हेच निवेदन राज्याचे मुख्यमंत्री त्यांच्या स्वाधीन करणार आहे. आज या ठिकाणी जितके शिष्टमंडळ उपस्थित आहे. हेच शिष्टमंडळ उद्या जाऊन मुख्यमंत्र्यांनी निवेदन देतील, असेही बनसोडे यांनी सांगितले.

# भाजपातर्फे पिंपरी-चिंचवडमध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त 'विजयोत्सव'

## विधायक उपक्रम: पिंपरी-चिंचवड शहरातून 1,45,000 राख्या लष्कराला पाठवणार!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड भाजप शहर कार्यालयात पार पडलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत यंदाचा स्वातंत्र्यदिन 'विजयोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत ‘ऑपरेशन सिंदूर’च्या यशानिमित्त लष्कराच्या सन्मानार्थ हा दिवस साजरा केला जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले.




श्री. काटे यांनी सांगितले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धाडसी नेतृत्वाखाली ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाले. दहशतवाद्यांविरोधात भारताने घेतलेली निर्णायक भूमिका देशासाठी अभिमानाची बाब आहे. त्यामुळे यंदाचा स्वातंत्र्यदिन 'विजयोत्सव' म्हणून साजरा करणे हे प्रत्येक देशभक्त नागरिकाचे कर्तव्य आहे."

**महत्त्वाचे उपक्रम:**

रक्षाबंधन विशेष उपक्रम:

पिंपरी-चिंचवड शहरातून १,४५,००० राख्या भारतीय जवानांसाठी पाठवण्यात येणार आहेत. हा उपक्रम सामाजिक सलोखा आणि बंधुत्व वाढवण्यासाठी राबवला जाणार आहे.

**‘हर घर तिरंगा’ अभियान:**

प्रत्येक घरावर तिरंगा फडकावण्यासाठी जनजागृती मोहीम राबवली जाईल. लहान मुलांच्या हस्ते तिरंगा फडकावण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

**इतर उपक्रम:**

तिरंगा यात्रा – प्रत्येक मंडल स्तरावर तिरंगा यात्रेचे आयोजन

स्वातंत्र्य सैनिक स्मारक स्वच्छता अभियान – शहरभरातील स्मारकांची स्वच्छता

विभाजन विभीषिका दिवस (१४ ऑगस्ट) – अखंड भारताच्या स्मरणार्थ विशेष कार्यक्रम

या बैठकीत भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन मोरेश्वर शेडगे यांनी केले.

# गणेश मूर्ती विसर्जनासाठी यंदा हौदांची संख्या वाढवणार

## पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

यंदाच्या गणेशोत्सवात मूर्ती विसर्जनाच्या व्यवस्थेचा दर्जा वाढवण्यासाठी महापालिकेने कृत्रिम हौदांची संख्या १६ वरून ३२ वर नेण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. शाडू मातीच्या मूर्तींसाठी विशेषतः १६ नवीन कृत्रिम हौद उभारले जाणार असून पीओपी मूर्तींसाठी स्वतंत्र हौदांची व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे मूर्तींचे योग्य वर्गीकरण, पर्यावरणपूरक विसर्जन आणि सुलभ व्यवस्थापन शक्य होईल. अशी माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.



आगामी गणेशोत्सवाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सार्वजनिक गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था, पर्यावरण प्रेमी यासह नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेली बैठक आयुक्त सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झाली. महापालिका अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता अनिल भालसाकळे, माणिक चव्हाण, उपायुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे, सहायक आयुक्त निवेदिता घार्गे, किशोर ननवरे, अश्विनी गायकवाड, अमित पंडित, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, तसेच विविध मंडळाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

आयुक्त सिंह यांनी बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना महापालिकेच्या पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती दिली. यंदाच्या गणेशोत्सवात मूर्ती विसर्जनाच्या व्यवस्थेचा दर्जा वाढवण्यासाठी महापालिकेने कृत्रिम हौदांची संख्या १६ वरून ३२ वर नेण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. शाडू मातीच्या मूर्तींसाठी विशेषतः १६ नवीन कृत्रिम हौद उभारले जाणार असून पीओपी मूर्तींसाठी स्वतंत्र हौदांची व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे मूर्तींचे योग्य वर्गीकरण, पर्यावरणपूरक विसर्जन आणि सुलभ व्यवस्थापन शक्य होईल. मूर्ती विक्रेत्यांसाठी ऑनलाइन नोंदणी प्रणाली लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. नागरिक, गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे काम करून शहराचा उत्सव अधिक पर्यावरणस्नेही आणि आदर्श व्हावा. गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यासाठी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही आयुक्त सिंह यांनी केले.

### 'पुनरावर्तन' मोहीम राबवली जाणार

» पिंपरी चिंचवड महापालिकेत यंदा गणेशोत्सव काळात इको एक्झिस्ट फाउंडेशन या संस्थेच्या मदतीने 'पुनरावर्तन' मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत शाडू मातीच्या गणेश मूर्तींचे विसर्जन केल्यानंतर ती माती पुन्हा संकलित करून मूर्तिकारांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले जाणार आहे. त्यानंतर मूर्तिकार ती माती पुन्हा मूर्तीसाठी वापरू शकणार आहेत.

" पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करताना महापालिकेच्या प्रत्येक विभागाने या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा. पीओपी आणि शाडू मातीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महापालिकेने नियोजन सुरू केले आहे. नागरिकांनी देखील पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यास प्राधान्य देऊन महापालिकेला सहकार्य करावे.

**- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# थेरगावमध्ये प्रारुप डीपीमुळे विकासाच्या नावाखाली विध्वंस!

## नागरिकांचा प्रशासनाविरोधात संताप: 23 वर्षांपूर्वी बांधलेल्या शाळेवर डीपी रोडचे आरक्षण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने थेरगावसह शहरातील अनेक भागांमध्ये अघोरी व बिनधास्तपणे विकास आराखडा रेट्रन लागू करण्याचा प्रयत्न सुरू केला असून, त्याविरोधात नागरिकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे. विशेषतः थेरगाव परिसरात जवळजवळ 70% भाग बाधित करणाऱ्या या आराखड्यामुळे रहिवाशांचे अस्तित्वच संकटात आले आहे.



प्रशासनाने आखलेल्या या कथित विकास आराखड्यात 9 मीटर, 12 मीटर, 15 मीटर आणि तब्बल 24 मीटर रस्ते थेट 100% वस्तीच्या मधून टाकण्यात आले आहेत. या बिनधास्त नियोजनामुळे अनेक घरं, दुकाने, समाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्थांचा अस्तित्व धोक्यात आला आहे. थेरगावमधील नागरिक, पालक, विद्यार्थी आणि समाजिक कार्यकर्ते या अन्यायकारक आराखड्याविरोधात एकवटले असून, थेरगाव बहुउद्देशीय रहिवासी संघ या माध्यमातून संघटित संघर्षाची सुरुवात झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महापालिकेच्या या मनमानी विरोधात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चाला थेरगावकरांचा प्रचंड पाठिंबा लाभला. मोर्चामध्ये मिलेनियम एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष विजय पवारांच्यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आणि तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या विरोध मोर्चात थेरगाव बहुउद्देशीय रहिवासी संघाचे कार्याध्यक्ष विजय पवार, अध्यक्ष अक्षय कांबळे, उपाध्यक्ष दीपक तरडे, सचिव नरेंद्र माने, खजिनदार प्रताप डुंबरे, सहसचिव आकाश पाटील, सहखजिनदार गणेश डोंगरे यांच्यासह कुणाल पवार, आकाश बारणे, संतोष पोकळे, हरीश पाठक, संजय ठाकरे, यशवंत माने, विजय माने, रुपेश गोरे, नाथाजी खंडागळे, निखिल साखळी, सूरज भंडारी, नंदाताई काकडे, मनीषाताई सुतार, माधुरीताई हिवाळे आणि असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शाळा उद्ध्वस्त होणार का?

» मिलेनियम एज्युकेशन संस्थेने थेरगावमध्ये 2002 पासून अल्प फीमध्ये उच्च दर्जाचं शिक्षण देणारी शाळा उभी केली — न्यू इंग्लिश मिडियम स्कूल — जी आज 1 हजार 200 विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे, ती शाळा प्रशासनाच्या नव्या आराखड्यात 24 मीटर रोडमध्ये येते, हे अत्यंत धक्कादायक आहे. शहरात सर्वसामान्यांसाठी शिक्षणाचं उज्वल उदाहरण ठरलेली ही शाळा उद्ध्वस्त होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. महापालिका प्रशासनाने डोळस आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन न ठेवता, संपूर्णपणे जमीन मालक, रहिवासी, समाजिक संस्था, शाळा, मंदिरे, स्मशानभूमी यांना न विचारता आणि कोणतीही पारदर्शक प्रक्रिया न राबवता हा आराखडा तयार केल्याने लोकांमध्ये आक्रोश आहे. थेरगावकरांचा इशारा स्पष्ट आहे " हा आराखडा रद्द करा, अन्यथा तीव्र जनआंदोलनाला सामोरे जा!".

" जिथं घरटी उभी आहेत, तिथं महामार्ग आखणं हे विकास नव्हे – हा अन्याय आहे. मी 23 वर्षांपासून थेरगावमध्ये शिक्षणाचा दिवा तेवत आहे – पण प्रशासनाचा आराखडा तो विझवण्याचा कट आहे. गोरगरिबांची, मध्यमवर्गीयांची शिक्षणसंस्था तुम्ही 24 मीटर रस्त्याखाली टाकणार? हा विकास नाही, हे सामाजिक अंधत्व आहे.

**– विजय पवार, अध्यक्ष, मिलेनियम एज्युकेशन संस्था.**

# निवडक अनधिकृत बांधकामांवर महापालिकेचा हातोडा

## पिंपरी-चिंचवड शहरातील सध्यस्थितीत चालू असलेल्या अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवर महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून कारवाई सुरु आहे.

**पिंपरी| प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील सध्यस्थितीत चालू असलेल्या अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवर महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून कारवाई सुरु आहे. यामध्ये महापालिकेच्या अधिकार्‍याकडून राजकीय दबावाखाली येत काही निवडक अनधिकृत बांधकामावर कारवाई केली जात आहे. यामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. ठराविक बांधकामांवरच कारवाई केली जात असल्याचा आरोप होत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामावर तातडीने कारवाई करण्यात यावी. फुटपाथवर अतिक्रमण होणार नाही, कारवाईमध्ये सातत्य ठेवा, असे निर्देश महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले आहे. या कारवाईला टाळाटाळ केल्यास थेट निलंबित करण्याचा इशारा आयुक्तांनी कर्मचार्‍यांना दिला आहे.

त्यानूसार महापालिकेच्या सर्वच क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दररोज अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कारवाई सुरु आहे.




### तक्रार अर्जावरून कारवाई

» तत्परता दाखवीत महापालिकेच्या ई क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मंगळवारी (दि.२६) कारवाई करण्यात आली आहे. मोशी येथील बाधिताने प्रश्नचिन्ह उपस्थित करीत फक्त मोजक्या तक्रारीवर कारवाई करीत आमदारांच्या दिमतीलाच महापालिका आहे का?, असा सवाल उपस्थित केला होता. त्यावर या कारवाईशी आमचा कसलाही संबंध नसल्याचे आमदारांच्या बंधूंनी सांगितले. संत तुकारामनगर, काळेवाडी, रहाटणी येथील अनधिकृत घरांवर कारवाई न करताच महापालिकेचे पथक माघारी आले होते.

परंतु, चिंचवड आणि भोसरी मतदारसंघातील कारवाई राजकीय दबावाखाली येत स्थानिक लोकप्रतिनिधीच्या सूचनेवरून केली जात असल्याची तक्रार बाधित नागरिकांकडून करण्यात आली आहे.

या गंभीर आरोपांमुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर आणि निष्पक्षतेवर संशय निर्माण होत आहे. महापालिकेचे बीट निरीक्षक व क्षेत्रीय अधिकारीही दबाव असल्याचे खासगीत मान्य करीत आहेत. मात्र, हे आरोप महापालिकेच्या वरिष्ठ अधिकार्‍यांनी फेटाळले आहेत.

देहू-आळंदी रस्त्यावरील आमचे बांधकाम पाडण्यासाठी शहरातील आमदारांच्या भावांनी महापालिकेवर दबाव आणला होता. त्या बांधकामाबाबत महापालिका विरुद्ध न्यायालयात खटला ही सुरू होता. आम्ही आयुक्तांसह सर्व अधिकार्‍यांना भेटलो. मात्र, त्यांनी कारवाई करताना भेदभाव केला. न्यायालयाचा अवमान करीत आमचे बांधकाम पाडले.

शहरातील सध्यस्थितीत चालू असलेल्या अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवर महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून कारवाई सुरु आहे. यामध्ये महापालिकेच्या अधिकार्‍याकडून राजकीय दबावाखाली येत काही निवडक अनधिकृत बांधकामावर कारवाई केली जात आहे. यामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून प्रश्नचिन्ह उभे राहत आहे

पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामावर तातडीने कारवाई करण्यात यावी. फुटपाथवर अतिक्रमण होणार नाही, कारवाईमध्ये सातत्य ठेवा, असे निर्देश महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले आहे. या कारवाईला टाळाटाळ केल्यास थेट निलंबित करण्याचा इशारा आयुक्तांनी कर्मचार्‍यांना दिला आहे.

### कारवाईत दुटप्पीपणा

» महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी हे अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावरची कारवाई नियमबद्ध होत असल्याचे दाखवत असले तरीही, प्रत्यक्षात क्षेत्रीय अधिकार्‍यांकडून दुटप्पीपणे कारवाई केली जात असल्याची अनेक उदाहरणे समोर आली आहेत. महापालिका आयुक्त ही अशा निवडक कारवायांना अप्रत्यक्ष समर्थन देत असल्यामुळे प्रशासनाच्या कामकाजामध्ये राजकीय दबाव असल्याची चर्चा आहे.

> “ शहरातील कोणतीही कारवाई वैयक्तिक आकसातून करण्यात येत नाही. सामान्य माणसाची तक्रार आली की, महापालिका त्यावर कारवाई करते. शहरातील इतर अनधिकृत बांधकामांवरही कारवाई टप्प्याटप्प्याने होणार आहे.
>
> - प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, महापालिका.

# मुळा नदी सुधार प्रकल्प रद्द करा; पर्यावरण प्रेमी नागरिकांची मागणी

## मुळा नदीच्या सौंदर्यीकरण आणि पुनर्रचना प्रकल्पासाठी सुमारे 1 हजार झाडांची तोड करण्यात येणार आहे.

**पिंपरी| प्रतिनिधी**

मुळा नदीच्या सौंदर्यीकरण आणि पुनर्रचना प्रकल्पासाठी सुमारे १ हजार झाडांची तोड करण्यात येणार आहे. झाडे तोडण्यास पर्यावरण प्रेमींकडून तीव्र विरोध दर्शवला आहे. महापालिकेच्या उद्यान विभागाने या झाडांच्या तोडीसंदर्भात ३१ जुलैपर्यंत हरकती व सूचना मागविल्या होत्या. त्यानंतर आज सोमवारी ४ ऑगस्टला सुनावणी घेण्यात आली. नागरिकांनी झाडांची तोड थांबवण्याची मागणी करत "नदी सुधार प्रकल्पच रद्द करा", अशी ठाम भुमिका घेतली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मुळा नदी सुधार प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पात नदी काठावरील सुमारे ४.८ किलोमीटर अंतराच्या पट्ट्यातील एक हजार झाडे तोडण्याचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरण समिती समोर आहे. मात्र, नदीकाठावरील झाडे तोडण्यास आणि स्थलांतरित करण्यास वृक्षप्रेमींनी कडाडून विरोध केला आहे. झाडे तोडण्यात येवू याकरिता ऑनलाईन 800 आणि प्रत्यक्ष लेखी दोनशेहून अधिक हरकती दाखल करत सुनावणीत वृक्षप्रेमींनी आक्षेप नोंदवले आहेत.

महापालिकेच्या उद्यान व पर्यावरण विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, मुळा नदीच्या काठावर एकूण ६,८४६ झाडे आहेत, त्यापैकी ३,५८५ झाडे वाचवली



जाणार असली तरी २,२५२ झाडांचे केवळ पुनर्रोपण करण्यात येणार आहे. मात्र, सर्वांत मोठा मुद्दा म्हणजे एक हजार झाडे सरळ तोडली जाणार आहेत, यात करंज, चिंच, बाभूळ आणि जंगली एरंडोल यांसारख्या स्थानिक प्रजातींचा समावेश आहे. ज्या पर्यावरणीय दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

### झाडांऐवजी काँक्रिटचा प्रकल्प?

» नदीकाठच्या दोन्ही बाजूंना काँक्रिटचे बांधकाम, सायकल ट्रॅक, वॉकवे आणि इतर नागरी सुविधा उभारण्याचे नियोजन आहे. मात्र, यामुळे हजारो झाडांचा बळी जाईल, असे कार्यकर्ते सांगत आहेत. त्यांच्यानुसार, नदी सुधारच्या नावाखाली नद्यांचे नैसर्गिक स्वरूप नष्ट करून सिमेंटकरणाचा अतिरेक केला जात आहे

> “ वृक्ष प्राधिकरण समितीकडे मुळा नदी सुधार प्रकल्पांसाठी तोडण्यात येणारे व स्थलांतरीत करण्यात येणा-या झाडांचा प्रस्ताव आहे. त्याबाबत हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्या प्राप्त हरकती व आक्षेपांवर सुनावणीची प्रक्रिया पार पडली. यानंतर आक्षेपांना उद्यान व पर्यावरण विभागाचा अभिप्राय घेऊन निर्णयास समितीसमोर सादर केले जाणार आहे.
>
> - महेश गारगोटे, मुख्य उद्यान अधिक्षक, महापालिका

# प्रदूषण नियंत्रण मंडळाची माहितीच सदोष

## पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या सचिवांसमोर 'सफर'च्या अधिकाऱ्यांनी केली पोलखोल

**पुणे | प्रतिनिधी**

संपूर्ण देशातील प्रदूषणाचे आकडे आम्हाला केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडूनच मिळतात. मात्र, त्यांची आकडेवारी सदोष असते. त्यामुळे प्रदूषणाचे विश्लेषण करताना आमची 'तारेवरची कसरत' होते. त्यांची आकडेवारीच सदोष असल्याने आम्ही अंदाज द्यायचे कसे? हे हतबल उद्गार आहेत

पुणे शहरातील पाषाण भागातील 'सफर' या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या 'आयआयटीएम' या संस्थेतील हवामानतज्ज्ञांचे. पुणे शहरातील पाषाण भागात पृथ्वी विज्ञान मंत्रालयाअंतर्गत चालणारी आयआयटीएम (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी) ही संस्था आहे. त्याच संस्थेचे 'सफर' (सिस्टिम ऑफ एअर क्वालिटी अँड अर्ली वॉर्निंग सिस्टिम) हा विभाग आहे. 'सफर'ची टीम ही देशातील दिल्ली, मुंबई, पुणे आणि अहमदाबाद या प्रामुख्याने चार अतिप्रदूषित शहरांतील हवाप्रदूषणाचा अहवाल दर मिनिटाला संकेतस्थळावर देत असते. याची पाहणी करण्यासाठी नुकतेच पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन पुणे शहरात आले होते. ते स्वतः पुण्यातील याच संस्थेत 1988 ते 1997 अशी दहा वर्षे हवामानशास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते. सध्या ते 2021 पासून पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव म्हणून काम पाहत आहेत. त्यांच्यासमोरच येथील शास्त्रज्ञांनी 'पॉवर पाइंट प्रेझेंटेशन' देत हवाप्रदूषणावर सादरीकरण केले. मात्र, दिल्लीच्या प्रदूषणाचा विषय पुढे येताच शास्त्रज्ञांनी आपली हतबलताच बोलून दाखवली. 'सफर'चे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांच्यात झालेला हा संवाद डोळे उघडणारा आहे.

पुणे शहरात पाषाण भागात देशातील दिग्गज हवामान शास्त्रज्ञांची मोठी टीम आहे. या संस्थेत दोन महासंगणक असून, त्यावर जागतिक दर्जाचे काम होते. नुकतेच या संस्थेने भारतीय प्रणालीचे हवामानचे हवामान मॉडेल देशाला दिले. त्यामुळे ही संस्था जगात प्रसिद्ध आहे. या ठिकाणी सार्क देशांतील हवामान शास्त्रज्ज्ञ प्रशिक्षणासाठी येतात. या संस्थेत देशातील दिल्ली, मुंबई, पुणे आणि अहमदाबाद या महानगरांतील हवा प्रदूषणाचे अपडेट दर सेकंदाला देत असते. या चारही शहरांतील सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म धूलिकणांसह हवेतील घातक वायुप्रदूषणाबाबत दररोज सविस्तर अहवाल दिला जातो. दररोजच्या धूलिकण प्रदूषणासह या चारही शहरांतील दिवाळीतील फटाक्यांमुळे झालेले प्रदूषणही ही संस्था नोंदवत असते.



### धुक्यावरील मॉडेल केले

» याच ठिकाणी शास्त्रज्ञांनी खास दाट धुक्याचा अंदाज देणारे जगातील सर्वोकृष्ट वायफेक्स नावाने एक मॉडेल तयार केले. त्याचे उद्घाटनही डॉ. रविचंद्रन यांनी केले. खास करून उत्तर भारतात हिवाळ्यात विमानांसह रेल्वे आणि इतर वाहनांचे अपघात टाळण्यासाठी हे मॉडेल आता काम करणार आहे. त्याची अचूकता 85 टक्के असल्याचा दावा येथील शास्त्रज्ञांनी केला आहे.

### महासंगणकावर होते काम

» या संस्थेत दोन महासंगणक असून, त्यावर हवामानाचे संशोधन होते. मात्र, यात देशभरातील प्रदूषणाची आकडेवारी देण्याचे काम हे स्थानिक प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी आणि सीपीसीबी) यांनी दिलेल्या आकडेवारीवर येथील शास्त्रज्ञ हवा प्रदूषणाचे अंदाज देतात.

### वायुमंडलीय रासायनिक प्रयोगशाळेचे उद्घाटन

» हवेतील जे घातक वायू आहेत त्यांची मोजणी करणारी अद्ययावत प्रयोगशाळा पुण्यातील पाषाण भागातील आयआयटीएम या संस्थेत उभारण्यात आली. त्याचे उद्घाटन पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. रविचंद्रन यांनी केले. या प्रयोग शाळेला वायुमंडलीय रासायनिक प्रयोगशाळा असे नाव देण्यात आले असून, आता येथून हवेतील प्रदूषित वायूंचा अभ्यास अधिकच सूक्ष्म पद्धतीने केला जाणार आहे. आयन एक्चेंज क्रोमॅटोग्राफीसह अनेक अद्ययावत यंत्रांद्वारे प्रदूषित वायूंचा अभ्यास केला जाणार आहे. या प्रयोगशाळेच्या प्रमुख डॉ. चैत्री रॉय यांनी त्याची माहिती या वेळी सर्वांना दिली.

# अवसरी खुर्द गावाला दररोज पाणीपुरवठा करा, ग्रामस्थांची ग्रामपंचायतीकडे मागणी

## ग्रामपंचायत घरमालकाकडून 360 दिवसांची पिण्याच्या पाण्यासाठी नळपट्टी घेते मात्र, पाणी 180 दिवस देत असल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली.

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील अवसरी खुर्द गावाला सद्यस्थितीत दिवसाआड होणारा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा दररोज करावा,अशी मागणी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे केली आहे. ग्रामपंचायत घरमालकाकडून ३६० दिवसांची पिण्याच्या पाण्यासाठी नळपट्टी घेते. मात्र, पाणी १८० दिवस देत असल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली.

अवसरी खुर्द हे गाव लोकसंख्येमध्ये तालुक्यात तीन नंबरचे मोठे गाव आहे. तसेच गावात शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी कॉलेज आहे. गावाला गेली १५ ते २० वर्षापासून ग्रामपंचायतच्या वतीने दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. पूर्वी कुटुंबाची लोकसंख्या कमी असल्याने दिवसाआड आलेले पाणी कुटुंबाला पुरत होते. मात्र, आता गावची लोकसंख्या वाढल्याने ग्रामपंचायतने दररोज एक तास नियमित पाणी सोडण्याची मागणी महिलावर्ग करत आहे. अवसरी खुर्द गावठाण व वाड्या वस्त्यांवर मोरदरा पाझर तलावातून नळपाणी पुरवठा केला जातो. गावाला नियमित व वेळेत पाणीपुरवठा व्हावा.

म्हणून माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी गेल्या पंधरा वर्षात अडीच ते तीन कोटी रुपयांना निधी उपलब्ध करून दिला. त्यानंतर मोरदरा पाझर तलावापासून दोन वेळा लोखंडी पाईपलाईन केली, विहीर खोदून नवीन टाकी उभारण्यात आली. परंतु पूर्वी गावची लोकसंख्या कमी असल्याने दिवसाआड सोडलेले



पाणी पुरेसे होते. आता गावची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तसेच गावात शासकीय कॉलेज असल्याने कॉलेजची मुले – मुली अवसरीतील खासगी वसतीवर वास्तव्यास असल्याने गावठाणात पाणी मोठ्या प्रमाणात लागते.

त्यातच महावितरण कंपनीचा वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा याचा परिणाम नळ पाणीपुरवठा योजनेवर होत आहे. मोरदरा पाझर तलावालगत असलेल्या विहिरीवर महावितरण कंपनीने दिवसा १२ तास वीजपुरवठा करावा किंवा ग्रामपंचायतने सोलर पॅनल बसवावे. अशी मागणी होत आहे. ग्रामपंचायत घरमालकाकडून ३६० दिवसांची नळपट्टी घेतली जाते. मात्र, पाणी १८० दिवस सोडत आहे. त्यात सुद्धा अनेक वेळा पाईपलाईन लिकेज होते. त्याचा परिणाम नळ पाणीपुरवठा योजनेवर होत आहे. त्या ठिकाणी ग्रामपंचायतीने योग्य नियोजन करून नियमित एक तास गावाला पाणीपुरवठा करावा.अशी मागणी गावठाणातील महिला वर्ग करत आहे.

> **“ सद्यस्थितीत खडकमाळ, शिंदेमळा, वायाळमळा, अभंगमळा, भोरवाडी येथे जलजीवन योजना अंतिम टप्प्यात असून काही त्रुटी आहेत. शासनाकडूनच योजनेला चालू करण्यासाठी उशीर होत आहे. योजनेला गती देण्यासाठी माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांची ग्रामपंचायत पदाधिकारी भेट घेऊन ठप्प असलेल्या जलजीवन योजनेला चालना देण्यासाठी प्रयत्न करणार.**
> **- वैभव वायळ,सरपंच, अवसरी खुर्द.**